# पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड
# पोलीस उप आयुक्त (गुन्हे )

---

## प्रेसनोट दि. १२/०२/२०२५.

## म्हाळुंगे एम.आय.डी.सी. मधील कैलाश स्टीलच्या मॅनेंजरवर गोळीबार करुन हत्येची सुपारी देणाऱ्या चुलत भावासह एका आरोपीस उत्तर प्रदेश येथुन गुंडाविरोधी पथकाने घेतले ताब्यात

दिनांक २०/०१/२०२५ रोजी१०/५० वा. सुमारास म्हाळुंगे पोलीस ठाणे हद्दीत कैलास स्टील कंपनीचे आवारात ता. खेड जि. पुणे येथे कैलास कंपनीचे मॅनेंजर अजय विक्रम सिंग वय- ३५ वर्षे रा. हिंजवडी, पुणे हे त्याच्या कंपनीच्या कॅबीनकडे जात असताना काळ्या शाईन मोटार सायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांना कोणत्यातरी अज्ञात कारणास्तव जीव मारण्याच्या उद्देशाने पिस्तुलने दोन गोळ्या मारुन जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने म्हाळुंगे पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ४४/२०२५ भा.न्या.स. कलम १०९, ३(५), भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास करणे बाबत मा. पोलीस आयुक्त, श्री.विनयकुमार चौबे यांनी आदेशीत केले.मा. सह पोलीस आयुक्त, श्री. शशिकांत महावरकर मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी., मा. पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) श्री. संदीप डोईफोडे यांनी घटनास्थळास भेट देवुन तपासकामी वेगवेगळ्या टिम बनवुन त्यांना तपासकामी सुचना दिल्या. त्या अनुशंगाने गुंडाविरोधी पथकाचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक श्री. एच.व्ही. माने, पोउनि श्री अशोक जगताप व गुंडाविरोधी पथकातील अंमलदार यांनी सदर घटनास्थळावरील वेगवेगळ्या ठिकाणचे सी.सी.टी.व्ही. फुटेज गोळा करुन पो.हवा. १७२९ शाम बाबा व पो.हवा. २०२९ मेदगे यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणावरुन फिर्यादी यांचा चुलत भाऊ नामे१) **संग्राम उर्फचंदन आनंत सिंग वय- ४२ वर्षे रा. १४०१, आर ७, लाईफ टु पब्लीक, कोलते पाटील, मारुंजी, पुणे** यांचेकडे तपास करता त्याने नमुद गुन्हा केल्याचे कबुल करुन त्यासाठी त्याने त्याचे ओळखीचे चार कामगार यांना १२ लाख रुपये देण्याचे कबुल केले.

ठरल्याप्रमाणे संग्राम सिंग याने वरील चार कामगार यांना अजय सिंग यांचा फोटो, कैलाश स्टील कंपनीचा पत्ता, गुगल लोकेशन व अजय सिंग याचा येण्या जाण्याचे टायमिंग दिले होते. वरील आरोपी यांनी घटनेच्या पाच ते सहा दिवस अगोदर वेगवेगळ्या गाड्या मधुन येवुन रेकी केली व अजय सिंगला मारण्याचा प्लॅन केला.

सदर तपासामध्ये आरोपी नामे**१) संग्राम उर्फचंदन आनंत सिंग वय- ४२ वर्षे रा. १४०१, आर ७, लाईफ टु पब्लीक, कोलते पाटील, मारुंजी, पुणे** यास दिनांक ११/०२/२०२५ रोजी अटक करण्यात आली असुन मा. कोर्टानी त्यास दिनांक १६/०२/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी मंजुर केली आहे. आरोपी नामे**२) रोहीत सुधन पांडे, वय- २३ वर्षे, राह- दुबहड, पोस्ट- बडसर, तहसील- बलीया, जिल्हा- बलीया, राज्य- उत्तर प्रदेश**यास जिल्हा बलिया राज्य उत्तर प्रदेश येथुन ताब्यात घेवुन पुढील तपास कामी गुन्हयाचे तपास अधिकारी वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. नितीन गिते म्हाळुंगे पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे. ते पुढील तपास करीत आहेत. अटक आरोपी नामे संग्राम उर्फचंदन आनंद सिंग यांचेवरती यापुर्वी फसवणुकीचे १) हाजीरा पो. ठाणे (गुजरात) व २) कळंबोली पो. ठाणे (महाराष्ट्र) येथे गुन्हे दाखल आहेत.उर्वरीत आरोपी अटक करणेसाठी गन्हे शाखा व स्थानिक पोलीस स्टेशनचे पथके प्रयत्न करत आहेत.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री.विनयकुमार चौबे सो मा. सह पोलीस आयुक्त, श्री. शशिकांत महावरकर सो., मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो., मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) संदीप डोईफोडे सो., मा. सहा पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. विशाल हिरे सो, यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक एच.व्ही. माने, पोउपनि, अशोक जगताप, स.पो.फौ पी.पी. तापकीर, स.पो.फौ. एस.एन. ठोकळ, स.पो.फौ. व्ही.एच. जगदाळे, स.पो.फौ. ए. पी. गायकवाड, पो.हवा ४८० जी.डी. चव्हाण, पो.हवा १६०४ एस. डी. चौधरी, पो.हवा ९५६ व्ही.टी. गंभीरे, पो.हवा २९२० जी.एस. मेदगे, पो.हवा. १७२९ एस.पी. बाबा, पो.हवा. १७२८ एन.बी. गेंगजे, पो.हवा. १७८८ व्ही.डी. तेलेवार,पो.शि. २०८४ व्ही.एन. वेळापुरे, पो.शि २८१२ आर. के. मोहीते,पो.शि २८४९ एस.टी. कदम, पो.शि२३८४ टी.ई. शेख यांनी केली आहे.

**( संदीप डोईफोडे )**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**